● प्रकाशक
अनिल शं. परांजपे
अथर्व, लेन ११,
प्रभात रस्ता, पुणे ४११००४

● © अनिल बोकील
७, सूर्यशील,
समर्थनगर,
औरंगाबाद ४३१००१
फोन : ९४२२२ ०३५५९
email : anil_bokil@rediffmail.com
www.indiathesuperpower.net

● प्रथमावृत्ती :
ऑगस्ट २००३

● मुखपृष्ठ :
देवेन कोतवाल

● मुद्रक :
सौ. शामला अनंत चिंचणीकर
माधुरी मुद्रण
४४३, शिवाजीनगर
पुणे ४११ ००५

● मूल्य : २५ रुपये

## वाचकांना आवाहन

समृद्ध भारत ! सुजलाम् सुफलाम् भारत !! आर्थिक महासत्ता भारत !!! हे शक्य आहे का? होय ! निश्चितच !! गरज आहे वेगळ्या पद्धतीने विचार करण्याची आणि वेगळ्या पातळीवर काम करण्याची...

समृद्धीच्या आणि भारताच्या मधे आज वाढती बेरोजगारी, गुन्हेगारी, भ्रष्टाचार, दहशतवाद असे अनेक अडथळे आहेत. या आणि अशा अनेक सामाजिक समस्यांचे मूळ भारताच्या आर्थिक दुरावस्थेत आहे आणि त्यास कारणीभूत आहे आपली दोषपूर्ण करप्रणाली व दुबळी बँकींग व्यवस्था. त्यामधे कोणते बदल केले असता आपल्या अर्थव्यवस्थेपुढील सर्व प्रश्न निःसंशयपणे सुटू शकतील याचे विवेचन या पुस्तिकेत केले आहे. आपल्या राज्यघटनेच्या चौकटीत राहूनच हे बदल करणे सहज शक्य आहे.

पण प्रत्येक नागरिकाच्या क्रियाशील सहभागाशिवाय हे बदल घडून येणे शक्य नाही. हा प्रश्न केवळ अर्थतज्ज्ञांच्या चर्चेचा नसून तुम्हा-आम्हा सर्वसामान्य जनतेचा आहे. म्हणूनच हे बदल घराघरात चर्चिले गेले पाहिजेत. त्याचबरोबर या बदलांची अंमलबजावणी करण्यासाठी सर्व स्तरांवरील लोकप्रतिनिधींपर्यंत आपण हा विचार पोहोचवावा हे कळकळीचे आवाहन !

आपली शंका वा सूचना या चळवळीला पाठबळच देईल याची आम्हाला खात्री आहे.

visit www.indiathesuperpower.net

# अनुक्रमणिका


**१. जागतिकीकरण व देशाची सद्य परिस्थिती**

**२. आदर्श करप्रणाली**

अ. प्रचलित करप्रणालीशी तुलना

ब. (*दोषपूर्ण*) प्रचलित करप्रणाली

क-१. स्वरूप

क-२. दोष व त्रुटी

क-३. परिणाम

**३. दुबळी बँकिंग व्यवस्था**

अ. बँकप्रणालीची अपेक्षित भूमिका

ब. पैसा कसा तयार होतो ?

क. पतसंवर्धन ( *Credit Expansion* ) कसे होते ?

ड. सद्य परिस्थिती

इ. परिणाम

फ. कारणे

**४. संकल्पित योजना**

अ. थोडक्यात संकल्पित योजना

ब. बँकिंगप्रणालीकडून अपेक्षा

क. केंद्रशासनाकडून अपेक्षा

ड. संकल्पित योजनेची वैशिष्ट्ये

इ. संकल्पित योजनेची व्यवहार्यता ( *Tables of Revenue* )

फ. संकल्पित योजनेचे अपेक्षित परिणाम

**५. संभाव्य शंका व उत्तरे**

# १. जागतिकीकरण व देशाची सद्य परिस्थिती

सध्याच्या जागतिकीकरण व उदारीकरणाच्या पार्श्वभूमीवर भारतीय अर्थव्यवस्था अभूतपूर्व अशा बदलास सामोरी जात आहे. भूतकाळातील नियंत्रित अर्थव्यवस्थेचे शिल्लक राहिलेले अवशेष वर्तमान परिस्थितीत धडाधड कोसळून पडत आहेत. मुक्त अर्थव्यवस्थेच्या संमत धोरणानुसार जागतिक बाजारपेठेत जास्तीत जास्त हिस्सा मिळवण्यासाठी विकसित व विकसनशील देशांत तीव्र स्पर्धा सुरू झाली आहे. प्रचंड भांडवली ताकद व प्रगत तंत्रज्ञानाच्या जोरावर विकसित राष्ट्रे जागतिक बाजारपेठेवर आपला अंमल बसवित आहेत. परिणामी विकसनशील राष्ट्रांच्या अर्थव्यवस्थांवर असहनीय ताण पडत आहे.

अपुरे भांडवल, कालबाह्य तंत्रज्ञान, कमकुवत पायाभूत सुविधा, सर्वव्यापी भ्रष्टाचार इत्यादी कारणांमुळे विकसनशील देश जागतिक बाजारपेठेतून बाहेर फेकले जात आहेत. वरील असंतुलित स्पर्धेमुळे भारतासारख्या विकसनशील देशाच्या अर्थव्यवस्थेवर अत्यंत गंभीर स्वरूपाचे परिणाम होत आहेत. स्पर्धात्मक दर्जा व किफायतशीरपणाअभावी हजारो उत्पादक कारखाने बंद पडत आहेत अथवा स्थापित क्षमतेपेक्षा कमी प्रमाणात उत्पादन करीत आहेत. परिणामी देशामध्ये बेरोजगारीच्या समस्येने उग्र रूप धारण केले आहे. बेरोजगारीच्या मूळ समस्येतून उद्‌भवलेल्या असंख्य जटिल प्रश्नांमुळे ( *दहशतवाद, जातीयवाद, गुन्हेगारी इत्यादी* ) देशातील लोकमानस असुरक्षिततेच्या भावनेने ग्रासले आहे. वेगाने पसरत असलेला सर्वव्यापी भ्रष्टाचार भारतासमोरील असंख्य अडचणींत भरच घालत आहे. ह्याबरोबरच वर्तमानकाळातील झपाट्याने बदलत जाणारी आंतरराष्ट्रीय आर्थिक, सामाजिक, भौगोलिक समीकरणे लष्करी महासत्तेच्या ( *अमेरिका* ) स्वार्थी व संधीसाधु नियमनामुळे भारताच्या परराष्ट्रीय व लष्करी धोरणांवर अवाजवी ताण निर्माण करीत आहेत.

देशांतर्गत पातळीवरील प्रश्नसुद्धा तितकेच गंभीर बनले आहेत. देशातील सर्वच राज्ये अभूतपूर्व आर्थिक संकटातून जात आहेत. कल्याणकारी राज्याच्या किमान संकल्पना राबविण्यातसुद्धा ( *रोजगार, कायदा व सुव्यवस्था, सार्वजनिक शिक्षण व आरोग्य, मूलभूत पायाभूत सुविधा इत्यादी* ) आर्थिकदृष्ट्या दुबळी राज्यसरकारे अपयशी ठरत आहेत. थोडक्यात



जागतिकीकरणाच्या प्रक्रियेमध्ये सर्वच पातळ्यांवरील शासनसंस्था ( *केंद्र, राज्य व स्थानिक प्रशासन* ) मोडकळीस आल्या आहेत व एकूण परिस्थिती अराजकतेच्या दिशेने वाटचाल करीत आहे.

अर्थात वर्तमान गंभीर परिस्थितीवर देशातील राजकीय नेतृत्व व अर्थतज्ज्ञ तोडगा शोधण्याचा प्रयत्न करीत आहेत. **‘ विजय केळकर समिती अहवाल ’**, **‘ प्रस्तावित मूल्यवर्धित करप्रणाली ’** इत्यादी आर्थिक सुधारणांवर विचार चालू आहेत.

देशात इतकी गंभीर परिस्थिती निर्माण होण्यामागे अर्थव्यवस्थेतील काही गंभीर त्रुटी/कमतरता आहेत. ह्या मूलभूत त्रुटी दूर झाल्या तर भारतीय अर्थव्यवस्था अत्यंत कमी काळात ( *दोन वर्षांच्या आत* ) रोगमुक्त होऊन विकसित राष्ट्रांच्या पंक्तीत स्थान मिळवू शकते.

देशाच्या आर्थिक अनारोग्यात प्रामुख्याने दोन कारणांचा सिंहाचा वाटा आहे.

१) दोषपूर्ण प्रचलित करव्यवस्था ( *Taxation System* )

२) दुबळी बँकिंग व्यवस्था

* * *

# २. आदर्श करप्रणाली

प्रचलित करव्यवस्था आदर्श करप्रणालीच्या कोणत्याही तत्त्वांचे पालन करीत नाही. जसे – समता ( *Equity* ), उत्पादकता ( *Productivity* ), सोपेपणा ( *Simplicity* ), निश्चितता ( *Certainty* ), लवचिकता ( *Elasticity* ), किफायती ( *Economic* ) इत्यादी. उलट वरील सर्व आदर्श तत्त्वांच्या विरुद्धच सध्याची करप्रणाली कार्य करीत आहे. आदर्श करप्रणाली तत्त्वांच्या उल्लंघनामुळे भारतीय अर्थव्यवस्थेत अनेक गंभीर दोष निर्माण झाले आहेत. जसे -

## प्रचलित करप्रणालीशी तुलना

*अ) समतेचे तत्त्व ( Canon of Equity ) :*

ह्या तत्त्वानुसार करआकारणी ही करदात्यांच्या उत्पन्नसापेक्ष असली पाहिजे.

अर्थात श्रीमंतांकडून जास्त व गरीबांकडून कमी करभार वसूल केला

जावा. ह्या तत्त्वानुसार करप्रणाली ही **प्रत्यक्ष कर ( *Direct Tax* )** ( *व्यक्तींच्या/संस्थेच्या निव्वळ उत्पन्नावरील कर* ) व **अप्रत्यक्ष कर ( *Indirect Tax* )** ( *वस्तु/सेवांवरील कर, जे उपभोक्त्यांवर लादले जाऊ शकतात* ) या दोन प्रमुख गटांत विभागली जाते. समतेच्या तत्त्वानुसार प्रत्यक्ष कराचे प्रमाण हे अप्रत्यक्ष करांपेक्षा नेहमीच जास्त असले पाहिजे. जे प्रचलित करप्रणालीमध्ये अगदी विरुद्ध प्रमाणात आहे ( *सध्याचे प्रत्यक्ष कराचे अप्रत्यक्ष करसापेक्ष प्रमाण २८:७२ असे आहे* ) .

*ब) उत्पादकतेचे तत्त्व ( Canon of Productivity ) :*

ह्या तत्त्वानुसार स्वीकृत करप्रणाली पुरेसा शासकीय महसूल जमा करण्यायोग्य असावी. गेल्या अनेक वर्षांतील शासनाची ( *केंद्र, राज्य व स्थानिक प्रशासन* ) वाढती महसुली तूट ( *Revenue Deficit* ) ही सध्याची करप्रणाली उत्पादकतेचे तत्त्व पाळण्यात पूर्णतः अपयशी ठरल्याचे दर्शविते.

*क) सोपेपणाचे तत्त्व ( Canon of Simplicity ) :*

ह्या तत्त्वानुसार करआकारणीची पद्धत अतिशय सोपी असावयास हवी, जी करदात्यास समजून घेण्यास व त्यानुसार करभरणा करण्यास मदत करू शकेल. सोपेपणाच्या निकषावर सध्याची समजण्यास अत्यंत क्लिष्ट असलेली करप्रणाली पूर्णतः अपयशी ठरते.

*ड) निश्चिततेचे तत्त्व ( Canon of Certainty ) :*

या तत्त्वानुसार करदात्यास करभरणा करावयाच्या रकमेचे व कालावधीचे निश्चित धोरण माहिती असावयास हवे. सध्याच्या करप्रणालीतील वेगवेगळे करबिंदू ( *Multiple Tax points* ), करदराच्या अनेक पातळ्या ( *Tax rates* ), तज्ज्ञांच्या मदतीशिवाय समजून घेण्यास कठीण असलेल्या करसवलती ( *Exemption* ), शासनाची असंबद्धरित्या बदलणारी धोरणे इत्यादी कारणांमुळे करदाता करभरणेबाबत नेहमीच संभ्रमात असतो. ही परिस्थिती निश्चिततेच्या तत्त्वाचे पूर्णपणे उल्लंघन करते.

*इ) लवचिकतेचे तत्त्व ( Canon of Elasticity ) :*

ह्या तत्त्वानुसार करप्रणाली अशी लवचिक असावयास हवी ज्यायोगे शासनास आपत्कालीन प्रसंगात ( *उदा. युद्ध, भूकंप, दुष्काळ, औद्योगिक मंदी इत्यादी* ) कर महसूल अत्यंत कमी काळात, सुलभरित्या पुरेशा प्रमाणात गोळा करता येऊ शकेल. वर्तमान करप्रणालीतील क्लिष्टता व करदरांबाबत गाठली गेलेली संपृक्त पातळी ह्या कारणांमुळे प्रचलित करप्रणालीने अपेक्षित लवचिकता गमावलेली आहे.

*फ) किफायतशीरपणाचे तत्त्व ( Canon of Economy ) :*

ह्या तत्त्वानुसार करप्रणालीची रचना अशी असावयास हवी ज्यायोगे करवसुलीसाठी लागणारा एकूण प्रशासकीय खर्च हा संकलित करमहसूलसापेक्ष न्यूनतम असावयास हवा. प्रचलित करप्रणालीचे अवाढव्य व अवाजवी स्वरूप किफायतशीरपणाच्या तत्त्वास हरताळ फासणारेच आहे.

## ( *दोषपूर्ण* ) प्रचलित करप्रणाली

**स्वरूप**

सध्याच्या प्रचलित करपद्धतीमध्ये स्थानिक, राज्य व राष्ट्र पातळीवरील शासकीय प्रशासनासाठी लागणारा महसूल हा त्या त्या पातळ्यांवर वेगवेगळ्या रूपाने संकलित केला जातो. जसे -

**अ) केंद्र शासनाचा कर महसूल**

भारतीय घटनेच्या सातव्या परिशिष्टात केंद्र सरकारच्या करांची यादी पुढीलप्रमाणे देण्यात आली आहे -

१) उत्पन्नावरील कर ( *कृषी उत्पन्न सोडून* ),
२) कार्पोरेशन टॅक्स,
३) आयातकर ( *Custom/Import Duty* ),
४) अबकारी कर/उत्पादशुल्क ( *वैद्यकीय किंवा प्रसाधनगृहातील रसायनांमध्ये न वापरले जाणारे मद्य वा अंमली पदार्थ सोडून* ),
५) कृषी जमीन वगळता मालमत्ता किंवा वारसा हक्कावरील शुल्क,
६) व्यक्तिगत किंवा कंपन्यांच्या संपत्तीरूपी भांडवल मूल्यावरील कर ( *कृषी जमीन सोडून* ),
७) आर्थिक व्यवहाराच्या कागदपत्रांवरील स्टॅम्प ड्यूटीज ( *मुद्रांक शुल्क* ),
८) भांडवली बाजार ( *स्टॉक एक्स्चेंजेस* ) उलाढाल व आगामी बाजारावरील ( *Future Market* ) मुद्रांकाशिवाय आकारले जाणारे कर,

९) वृत्तपत्र विक्री-खरेदी व त्यातील जाहिरातींवरील कर,
१०) रेल्वेहमाली व भाडे यावरील कर,
११) वाहतूक स्थानकावरील प्रवासी व वस्तू यांच्या वाहतूकीवर ( *रेल्वे, समुद्र, विमान इत्यादी* ) लावलेला कर,
१२) आंतरराज्य व्यापारात वस्तूच्या खरेदी-विक्रीवरील कर.

**ब) राज्य शासनाचा कर महसूल**

भारतीय घटनेच्या सातव्या परिशिष्टात राज्यांनी वसूल करावयाचे कर यादी ११ मध्ये पुढीलप्रमाणे दिलेले आहेत :

१) जमिनीवरील महसूल,
२) वृत्तपत्रांचा अपवाद वगळता वस्तूंच्या खरेदी-विक्रीवरील कर,
३) कृषीउत्पन्नावरील कर,
४) जमीन व इमारतीवरील कर,
५) कृषी जमिनीवरील वारसा व इस्टेट ड्यूटी,
६) मद्य आणि अमली पदार्थावरील अबकारी कर,
७) स्थानिक भागात आलेल्या मालावरील कर,
८) खनिज उत्पादनावरील कर ( *संसदेने घातलेली बंधने वगळून* ),
९) विजेचा वापर आणि विक्री यावरील कर,
१०) वाहने, जनावरे आणि बोटींवरील कर,
११) आर्थिक दस्तऐवज वगळता इतरांवरील मुद्रांक शुल्क ( *स्टॅम्प ड्यूटीज* ),
१२) अंतर्गत ( *आंतरराज्य* ) जलवाहतूक आणि मंडळांची प्रवासी वाहतूक आणि मालाची ने-आण यावरील कर,
१३) करमणूक, जुगार आणि शर्यती तसेच चैनीवरील कर,
१४) टोल,
१५) व्यवसाय, व्यापार आणि नोकऱ्यांवरील कर,
१६) भांडवलावरील कर,
१७) वृत्तपत्रांशिवायच्या जाहिरातींवरील कर.



**क ) स्थानिक पातळीवरील महसूल -**

जकात, मालमत्ता कर व अन्य प्रकारचे स्थानिक कर व शुल्कांद्वारे संकलित केला जातो.

**प्रचलित करप्रणालीतील दोष व त्रुटी**

वर्तमान करप्रणालीमध्ये निःसंशयपणे बरेच दोष व त्रुटी निर्माण झाल्या आहेत. जसे,

१) करांचे अनेक प्रकार ( *multiplicity of taxes* ) :

आपल्या देशाच्या विविध स्तरावरील प्रशासकीय पातळ्यांमुळे ( *केंद्र, राज्य व स्थानिक स्वराज्य संस्था* ) महसूल निर्मितीसाठी अनेक प्रकारचे कर अस्तित्वात आले आहेत. त्याचबरोबर करांचा पाया विस्तृत करण्याच्या गरजेपोटी करप्रकारांमधे वाढच होत आहे. या सर्व करांच्या रचनांमुळे प्रचलित करप्रणालीमधे बहुसंख्यत्व हा दोष निर्माण झाला आहे.

२) करसंकलनातील क्लिष्टता ( *Complex nature of taxes* ) :

अनेक प्रकारचे कर व त्यांचे दर, त्याचबरोबर करातील विविध प्रकारची सूट यामुळे प्रचलित करप्रणाली समजून घेण्यास अतिशय क्लिष्ट ठरत आहे. यामुळे करदात्यास त्याचे करदायित्व समजून घेण्यास अडचण निर्माण होते.

३) अप्रत्यक्ष करांवरील भर ( *Reliance on Indirect Taxes* ) :

आदर्श करप्रणालीच्या तत्त्वानुसार, कररचना ही प्रगतीशील ( *progressive* ) असावयास हवी. ह्यानुसार आर्थिकदृष्ट्या सबळ घटकांचे करदायित्व तुलनात्मकदृष्ट्या दुर्बळ घटकांपेक्षा जास्त असावयास हवे, जे फक्त प्रत्यक्ष करामार्फतच ( *direct tax* ) शक्य होते.

प्रत्यक्ष कर हा करदात्याकडून थेटपणे वसूल केला जातो. या प्रकारात करभार हा *शिफ्ट* केला जाऊ शकत नाही. याउलट अप्रत्यक्ष कर हा थेट ग्राहकाच्या खिशातून वसूल केला जाऊ शकतो.

शासकीयदृष्ट्या अप्रत्यक्ष कराची वसूली त्यावर होणाऱ्या प्रशासकीय खर्चासापेक्ष अत्यंत प्रभावी असते. ह्यामुळे, शासनाचा साहजिक कल हा अप्रत्यक्ष करांकडे वाढत आहे. ( *२००२-२००३ च्या केंद्रीय/राज्यशासनाच्या अंदाजपत्रकानुसार, अप्रत्यक्ष करांचे प्रत्यक्ष करांशी प्रमाण जवळपास ७०:३०*

*असे आहे.* ) अप्रत्यक्ष करांच्या वाढत्या प्रमाणामुळे प्रचलित करप्रणाली प्रतिगामी ( *regressive* ) ठरत आहे.

४) अशास्त्रीय स्वरूप ( *Arbitrary & Irrational Nature* ) :

प्रचलित करप्रणालीमधे राजकीय हेतूने वारंवार केल्या गेलेल्या अशास्त्रीय बदलांमुळे वर्तमान करपद्धतीचे सध्याचे अशास्त्रीय स्वरूप अस्तित्त्वात आले आहे. यामुळे, प्रामाणिक करदात्यास अवास्तव मनस्तापास सामोरे जावे लागत आहे.

५) अस्थैर्य ( *Instability/Uncertainty* ) :

करदरांत वारंवार केल्या जाणाऱ्या बदलांमुळे व सातत्याने केल्या जाणाऱ्या करबदलांमुळे प्रचलित करप्रणाली ही अस्थैर्याच्या दोषास बळी पडत आहे. त्यामुळे उद्योगधंद्यांना भविष्यकालीन योजना बनविण्यात अडथळे निर्माण होत आहेत.

६) करचुकवेगिरीची संधी ( *Scope for Evasion* ) :

प्रचलित करप्रणालीच्या क्लिष्ट स्वरूपामुळे व करवसुली यंत्रणेच्या अन्यायकारक/मनमानी कारभारामुळे करदात्याचा कल करचुकवेगिरीकडे वाढत आहे. यामुळे समांतर अर्थव्यवस्थेस बळकटी मिळून कायदेशीर अर्थव्यवस्था दुबळी होण्यास मदत होत आहे.

७) करप्रणालीचा संकुचित पाया ( *Narrow base* ) :

प्रचलित करप्रणालीमध्ये राजकीय हेतूंनी दिल्या गेलेल्या विविध सवलतींमुळे करसंकलनाचा पाया अतिशय संकुचित झाला आहे. परिणामतः करमहसूलवाढीच्या कारणास्तव सध्या कर भरणाऱ्या करदात्यांवर वाढत्या करदरांचा असहनीय ताण पडत आहे.

८) लवचिकतेचा अभाव ( *Inelastic Nature* ) :

आदर्श करप्रणालीच्या संमत तत्त्वानुसार, करप्रणाली अशी लवचिक असावयास हवी ज्यानुसार आपत्कालीन प्रसंगात ( *युद्ध, भूकंप, पूर इत्यादी* ) शासकीय महसूलात, अत्यंत कमी वेळात कमीत कमी बदल घडवून आवश्यक ती वाढ शक्य व्हावी. सध्याच्या करप्रणालीचे स्वरूप पाहता, अशा प्रसंगात वर्तमान करप्रणाली ताठर व कुचकामी ठरते.



## परिणाम

वर्तमान दोषपूर्ण करप्रणाली ही काळ्या पैशाची पर्यायाने समांतर अर्थव्यवस्थेची जननी ठरते. समांतर अर्थव्यवस्थेचे विक्राळ स्वरूप कायदेशीर अर्थव्यवस्थेस गिळून टाकत आहे. ( *केंद्र शासनाने नेमलेल्या 'सांसदीय समिती – १९९८'च्या अंदाजानुसार देशांतर्गत अर्थव्यवस्थेत समांतर अर्थव्यवस्थेचा वाटा जवळपास ६५ ते ७०% इतका आहे व त्या अर्थव्यवस्थेच्या वाढीचा दर १३.५% आहे तर कायदेशीर अर्थव्यवस्थेचा वाटा ३०-३५% असून वर्तमान वाढीचा दर फक्त ४.८ % आहे.* )

१) काळ्या पैशाची अनियंत्रित निर्मिती – परिणामी भ्रष्टाचारास प्रचंड वाव
२) अंदाजपत्रकीय महसूलतुटीत सातत्याने वाढ – परिणामी सरकारी विकासयोजनांवर साधनसंपत्तीअभावी गंभीर परिणाम
३) अवाजवी करआकारणी पद्धतीमुळे उद्योग व व्यवसायक्षेत्रात संशोधन, विकास व गुणवत्ता दर्जाबाबत कमालीचे औदासिन्य – परिणामी उद्योगक्षेत्रावर सतत मंदीचे सावट, परकीय उद्योगांचे देशाच्या बाजारपेठेवर आक्रमण, देशांतर्गत उद्योगांची रोजगार-निर्मिती-शक्ती सातत्याने क्षीण – परिणामी बेकारीत भयावह वाढ.
४) देशातील मनुष्यबळाच्या सर्जनशीलतेवर व कल्पकतेवर अतिशय विपरीत परिणाम – देशांतर्गत बाजारपेठ पूर्णतः परकीय तंत्रज्ञानावर अवलंबून – सातत्याने आयात व निर्यातीमधील तफावतीमधे वाढ – परिणामी स्वदेशी चलनावर अवमूल्यनाची टांगती तलवार
५) काळ्या पैशाच्या अनियंत्रित वाढीमुळे बेकायदेशीर, अनैतिक व्यवहाराचा समाजावर घातक परिणाम ( *राजकारण, समाजकारण, अर्थकारण, शिक्षण, आरोग्य इत्यादी व्यवस्थेत काळ्या पैशाचे थैमान* ) परिणामी देशातील लोकमानस असुरक्षिततेच्या भावनेच्या आहारी.
६) सहकारी महसूल खात्याच्या अनिर्बंध अधिकारवापरामुळे ( *Nuisance power* ) सृजनशील व प्रामाणिक मनुष्यबळ सतत दबावाखाली.

७) अतिरिक्त महसूलासाठी सरकारकडून लोकविघातक उद्योगांना चालना. ( *उदा. दारू, सिगारेट इ. मादक पदार्थ, लॉटरी इ.* )

८) अत्यंत जाचक करप्रणालीमुळे सरकारी महसूलात सातत्याने घट, परिणामी केंद्र-राज्य व राज्य-स्थानिक प्रशासन संबंधात कटुता.

९) आपत्कालीन परिस्थितीस तोंड देण्यास सरकारची आर्थिकदृष्ट्या असहाय्यता ( *उदा. युद्ध, भूकंप, पूर, महामारी इत्यादी* )

१०) भ्रष्टाचाराच्या थैमानामुळे कायदा व सुव्यवस्था कायम तणावाखाली.

११) काळ्या पैशाच्या समांतर अर्थव्यवस्थेमुळे बँकांचे व्याजदर उच्च पातळीवर – परिणामी महागाईस मुक्त वाव.

१२) मुबलक पतपुरवठ्याअभावी उद्योगधंद्यांवर होणाऱ्या विपरित परिणामांपासून बचावासाठी देशातील नागरिकांचा पैशाचा बचतीच्या स्वरूपात गोठविण्याकडे कल – परिणामी चलनचक्रावर ( *Money Cycle* ) विपरित परिणाम.

१३) भ्रष्टाचाराच्या ओझ्याखाली दबल्यामुळे देशातील विकसित मनुष्यबळ स्थलांतरास उत्सुक – परिणामी देशविकासाच्या कार्यात अडथळे.

१४) देशाची अर्थव्यवस्था परकीय अर्थसंस्थांच्या दबावाखाली, देशाची तत्त्वप्रणाली व स्वायत्तता परकीय नियंत्रणाखाली जाण्याचा धोका – परिणाम देशफुटीचा धोका संभव. ( *उदा. इंडोनेशिया* )

१५) शासनास महसूली तुटीमुळे नागरिकांच्या किमान गरजा ( *अन्न, वस्त्र, निवारा, आरोग्य, शिक्षण इत्यादी* ) भागविण्यात अपयश. परिणामी देशांतर्गत असंतोष वाढीस.

## ३. दुबळी बँकिंग व्यवस्था

### ३ अ – बँक प्रणालीची अपेक्षित भूमिका

ज्याप्रमाणे रक्तवाहिन्या शरीराच्या सर्व अवयवांना रक्त पुरवण्याचे काम करतात त्याचप्रमाणे अर्थव्यवस्थेमध्ये बँकिंग प्रणाली सर्व सामाजिक, वैयक्तिक घटकांना भांडवल पुरवण्याचे काम करत असते. भांडवलाची अर्थव्यवस्थेतील भूमिका ही शरीररचनेतील रक्ताप्रमाणे असते. रक्त ज्याप्रमाणे शरीरातील प्रत्येक पेशीस जीवनसत्वे व ऑक्सिजनचा पुरवठा करते व शरीरातून उत्सर्जित करावयाचे घटक स्वत:बरोबर वाहून नेते त्याचप्रमाणे आर्थिक व्यवस्थेमध्ये निर्मितीस प्रोत्साहित करणारी भूमिका भांडवल बजावत असते. सदोष रक्तप्रणालीमुळे शरीरावर जसे दुष्परिणाम होतात त्याप्रमाणे सदोष भांडवल निर्मिती व वितरण व्यवस्थेमुळे अर्थव्यवस्थेवर गंभीर परिणाम होत असतात.

### ३ ब – पैसा कसा तयार होतो ?

१) Coin Money :

रु. पाचपर्यंतची नाणी Govt. Treasuries मधून तयार केली जातात. यासाठी कुठल्याही Security ची गरज नसते.

२) Currency Money :

केंद्र सरकारच्या Securities अथवा परकीय चलन साठ्याच्या मोबदल्यात भारतीय रिझर्व्ह बँक नोटांच्या स्वरूपात पैसा चलनात आणते.

३) Bank Money / Demand Deposits :

पतसंवर्धनाद्वारे ( *Credit Expansion द्वारा* ) निर्माण होणारा पैसा म्हणजे बँक मनी.

### ३ क – पतसंवर्धन ( *Credit Expansion* ) कसे होते ?

समजा, बँक ‘ अ ’ कडे – कोणा व्यक्तीच्या नावावर रु. २००० जमा आहेत. किमान १०% राखीव रोखता प्रमाण ( *Cash Reserve Ratio* ) धरून ही बँक ( *बँक ‘ अ ’* ) रु. २०० राखीव रोखता गरज ( *Cash Reserve Requirement* ) म्हणून ठेवेल व रु. १,८०० पर्यंतची उत्पादक ठेव ( *Derivative Deposit* ) तयार करेल. म्हणजेच रु. १,८०० ही बँकेकडील जास्तीची राखीव शिल्लक ( *Excess Reserves* ) होय. ही जास्तीची राखीव शिल्लकच बँक कर्ज ( *Loans / Advances* ) देण्यासाठी वापरते. समजा कर्जदार श्री. ‘ क्ष ’ आपले व्यवहारातील एक देणे चुकते करण्यासाठी श्री. ‘ स ’ यांस रु. १,८०० चा धनादेश देतात. श्री. ‘ स ’ यांचे बँक ‘ ब ’मध्ये खाते आहे व हे रु. १,८०० ( *धनादेशाच्या स्वरूपात* ) ते

बँकेत जमा करतात. आता, बँक ' ब ' ला रु. १,८०० मिळतात. हे रुपये १८०० त्यावरील CRR वगळून पुढील रक्कम कर्ज देण्यासाठी वापरू शकते. ( *१८०० - १८० ( CRR @ १०% ) = १६२०* ).

हे असेच पुढे चालू राहिल्यास/ठेवल्यास, खालील तक्त्याच्या आधारे आपल्या असे लक्षात येईल की, मूळ रु. २,००० च्या प्राथमिक ( *अनुत्पादक* ) ठेवी ( *Primary Deposit* ) मधून रु. १८,००० ची उत्पादक ठेव ( *Derivative Deposit* ) तयार झाली.

**तक्ता :**

बँक प्रणालीद्वारे वाढत जाणारी पत ( *Multiple Expansion of Credit through Banking System* )

| बँका | प्राथमिक/ अनुत्पादक ठेवी / देणी (Liabilities/ Primary Deposits) ( रुपये ) | राखीव रोखता (Cash Reserves) @ १०% प्रमाणे ( रुपये ) | कर्जे/ उत्पादक ठेवी (Loans / Derivative Deposits) ( रुपये ) |
|---|---|---|---|
| अ | २०००* | २०० | १८०० |
| ब | १८०० | १८० | १६२० |
| क | १६२० | १६२ | १४५८ |
| ड | १४५८ | १४५ | १३१३ |
| इ | १३१३ | १३१ | ११८२ |
| : | : | : | : |
| | २०००० | २००० | १८०००** |

*मूळ अतिरिक्त रक्कम ( Primary Deposit )

**बँकप्रणालीने निर्माण केलेली भांडवलवृद्धी



राखीव रोखता प्रमाण ( *Cash Reserve Ratio* ) जेवढे अधिक तेवढा पत गुणांक ( *Credit Multiplier* ) कमी व जेवढे राखीव रोखता प्रमाण कमी, तेवढा पत गुणांक अधिक.

$$\text{पत गुणांक} = \frac{\text{एकूण उत्पादक ठेवी}}{\text{मूळ जास्तीची शिल्लक}}$$

$$\text{Credit Multiplier} = \frac{\text{Volume of Derivative Deposits}}{\text{Original Excess Reserves}}$$

$$\text{पत गुणांक} = \frac{१,८०००}{१,८००} = १०$$

## ३ ड – भारतातील बँकिंगशी संबंधित आकडेवारी

स्रोत : www.rbi.org.in

जानेवारी २००३ ( *आकडे कोटी रुपयांत* )

करन्सी मनी - २,६५,३२५

बँक मनी - १,८५,२३२

या आकडेवारीवरून असे लक्षात येते की, भारतात बँक मनी हा करन्सी मनीहून कमी आहे. ( *तुलना करायची झाल्यास, अमेरिकेमधे बँक मनी हा करन्सी मनीच्या अंदाजे पाचपट आहे.* ) याचाच अर्थ असा की, भारतात पत संवर्धन ( *Credit Expansion* ) हे अपेक्षित प्रमाणात होतच नाही. पैसा ( *बँक मनी* ) तयारच होत नसल्याने पैसा हीच मौल्यवान गोष्ट झाली आहे. व सर्वजण त्यामागे धावत आहेत. पैसा ( *बँक मनी* ) तयार होत नसल्याने अर्थव्यवस्थेत सतत पैशाची कमतरता जाणवते. त्यामुळे भारतीय बाजारपेठ वस्तू व सेवा यांच्या गुणवत्ता दर्जापेक्षा ( *Quality* ) किफायतशीरपणावरच ( *Affordability* ) भर देते. त्यामुळे, आजच्या जागतिकीकरणाच्या काळामधे, भारतीय उत्पादने/सेवा यांचा दर्जा तुलनात्मकदृष्ट्या नेहमीच निम्नस्तरीय राहतो.

## ३ इ – दुबळया बँकिंग व्यवस्थेचे परिणाम

१) अपुरी भांडवल निर्मिती : विकसित राष्ट्रांसापेक्ष भारतीय अर्थव्यवस्थेत बँक माध्यमाद्वारे केल्या जाणाऱ्या व्यवहाराचे अत्यल्प प्रमाण

भारत : ७०% रोखीने व ३०% बँकेमार्फत.

विकसित राष्ट्रे : १५% रोखीने व ८५% बँकेमार्फत.

२) बँकमाध्यमाच्या कमीत कमी वापरामुळे पतप्रसारणाद्वारे ( *Credit Expansion* ) निर्माण होणारा क्षीण भांडवल पुरवठा ( *Capital Supply* ) भारतीय अर्थव्यवस्थेवर गंभीर परिणाम घडवत राहील.

३) अपुऱ्या भांडवल निर्मितीमुळे भारतीय औद्योगिक क्षेत्रामधे संसाधन निर्मितीची तीव्र कमतरता

४) शेती व उद्योगधंद्यांची खुंटलेली वाढ/अत्यल्प प्रगती

५) अर्थव्यवस्थेतील बहुतांश पैसा बँकिंग प्रणालीबाहेर ( *काळा पैसा* ) कार्यरत – जो समांतर अर्थव्यवस्थेस कारणीभूत ठरतो.

६) भ्रष्टाचारास पूरक ठरणाऱ्या समांतर अर्थव्यवस्थेची अनियंत्रित वाढ

७) अ) बँक अपरोक्ष व्यवहारांमुळे मुळात पतनोंदणीच ( *Credit Registration* ) होत नाही व पर्यायाने पत इतिहास ( *Credit history* ) नाही.

ब) पत इतिहास ( *Credit history* ) नसलेल्या लोकांना कर्जे मिळणे

क) बंद पडत असलेले उद्योगधंदे, मंदावलेले/थांबलेले पैशाचे चक्र ( *Money Cycle* )

ड) वेळेवर न मिळालेले भांडवल

या सर्व कारणांस्तव बँकांचे ***N.P.A. ( Nonperforming Assets )*** वाढत आहेत.

८) **N.P.A.** च्या प्रश्नामुळे बँका कर्ज देताना अधिकाधिक सावधगिरी बाळगताना दिसतात – त्यातून अधिक सुरक्षेची ( *security* ) मागणी यामुळे सामान्य माणूस कर्ज घेऊ शकत नाही – यातून भांडवलाचा अभाव ( *Scarcity of Capital* ) निर्माण होतो व त्यातून भांडवलवृद्धीमध्ये होणारी सततची घट

९) N.P.A. मुळे बँकांचे अर्थकारण धोक्यात



### ३ फ – बँकिंगप्रणालीला ही अवस्था प्राप्त होण्यास कारणीभूत ठरणाऱ्या गोष्टी

१) एकूण आर्थिक व्यवहारांपैकी अत्यल्प व्यवहार हे बँकेमार्फत होतात

२) पत इतिहास ( *Credit History* ) असलेल्या ग्राहकांचे अत्यल्प प्रमाण

३) उच्च दर्शनी मूल्य असलेल्या नोटांच्या उपलब्धतेमुळे रोखीने करावयाच्या व्यवहारात असलेली सुलभता

४) दोषपूर्ण प्रचलित करप्रणाली – जी करचुकवेगिरीला प्रोत्साहन देणारी ठरते व पर्यायाने काळा पैसा तयार होण्यास ( *करण्यास* ) कारणीभूत ठरते.

५) सतत बदलणारी आर्थिक धोरणे – ज्यामुळे बँकेऐवजी रोखीने व्यवहार करण्याकडे वाढणारा कल

* * *

## ४. संकल्पित योजना

### ४ अ – थोडक्यात संकल्पित योजना

१) सध्या अस्तित्वात असलेली करप्रणाली पूर्णतः नष्ट करणे ( *कस्टम ड्यूटी सोडून* )

२) सरकारी महसूलासाठी फक्त ‘ Transaction Tax ’ हा सिंगल पॉईंट डिडक्शन Tax लागू करणे.

***बँकेद्वारे होणाऱ्या प्रत्येक Transaction वर एका निश्चित प्रमाणात वजावट करणे, ( जसे २ % प्रती व्यवहार ) वजावट फक्त जमा खात्यावरच ( रिसिव्हींग एंड A/c लाच ) व्हावी, ही २% वजावट निश्चित प्रमाणात केंद्र सरकार, राज्य सरकार, स्थानिक प्रशासन व त्या विवक्षित बँकेच्या खात्यावर वर्ग करण्यात यावी. ( उदा. ०.७०% केंद्र सरकार, ०.६०% राज्य सरकार, ०.३५% स्थानिक प्रशासन संस्था व ०.३५% बँक )***

***संकल्पित योजनेनुसार रोखीच्या कुठल्याही व्यवहारावर Transaction Tax हा लागू असणार नाही.***

**४ ब – ह्या योजनेच्या यशस्वितेसाठी बँकेकडून काही अपेक्षा**

१) ह्या योजनेअंतर्गत शासनाचा सर्व महसूल एकाच केंद्रावर म्हणजे बँकेच्या Transaction Point वर संकलित होत असल्यामुळे बँकांवर विशेष जबाबदारी कार्यान्वित होण्याची गरज आहे.

२) सर्व बँका व Clearing Houses सतत २४ तास कार्यान्वित असाव्यात ( *६ तासाच्या ४ शिफ्टमध्ये बँकांचे काम चालणे इष्ट.* )

३) बँकांचे पूर्णतः संगणकीकरण व्हावे

४) बँकेद्वारे होणाऱ्या प्रत्येक Transaction मधून बँकेस मिळणाऱ्या ०.३५% ह्या अतिरिक्त महसुलामधून बँकांनी व्यवस्थापनाचे आधुनिकीकरण करणे व अत्याधुनिक स्वरूपातील व्यवहारास चालना देणे अपेक्षित आहे. ( *उदा. प्रत्येक बँकेचे Credit Card / Debit Card व्यवहार अपेक्षित आहे.* )

**४ क – केंद्रशासनाकडून अपेक्षा**

१) सदरील योजनेत करसंकलन फक्त बँकेमार्फतच होणार असल्यामुळे साहजिकच लोकांचा कल रोखीच्या व्यवहाराकडे वळून शासकीय महसूलात तूट येण्याची शक्यता आहे. हे टाळण्यासाठी अर्थ मंत्रालयाने/रिझर्व्ह बँकेने काही विशिष्ट कालमर्यादेत उच्च दर्शनीमूल्यांच्या चलनी नोटांचे उच्चाटन करणे आवश्यक आहे. रु. ५० पेक्षा उच्च दर्जाचे दर्शनी मूल्य असलेल्या चलनाचे उच्चाटन करावे. ह्यामुळे लोकांना बँकेमार्फत व्यवहार करणेच जास्त सोईचे होईल. परिणामी शासनाच्या महसुलात लक्षणीय वाढ होईल.

पुढील तक्त्यावरून भारत व विकसित देश यांच्यातील दरडोई उत्पन्न व सर्वात मोठी चलनी नोट यांच्या प्रमाणातील प्रचंड तफावत स्पष्ट होते.

| देश | दरडोई उत्पन्न (A) | सर्वात मोठी चलनी नोट (B) | A/B |
|---|---|---|---|
| अमेरिका | ३०,००० डॉलर | १०० डॉलर | ३०० |
| ग्रेट ब्रिटन | १८,००० पौंड | ५० पौंड | ३६० |
| जपान | ४०,००,००० येन | १०,००० येन | ४०० |
| ***भारत*** | ***१६,००० रुपये*** | ***१००० रुपये*** | ***१६*** |



२) शासनाचा सर्व महसूल फक्त बँकेमार्फतच संकलित केला जाणार असल्यामुळे सरकारने बँकांस अतिविशिष्ट अनिवार्य सेवेचा दर्जा देणे आवश्यक आहे.

३) शासनाची काही विशिष्ट आर्थिक मर्यादेपर्यंतच रोखीच्या व्यवहारांना कायदेशीर मान्यता अपेक्षित ( *जसे रु. २००० पर्यंतचे व्यवहार* ) अशा रोख व्यवहार मर्यादा निश्चितीकरणामुळे बँकव्यवहारास चालना मिळून शासकीय महसुलात लक्षणीय वाढ अपेक्षित.

४) शासनाने महसूल संकलन कायद्यांतर्गत न वटणाऱ्या धनादेशाबाबत कडक कायदेविषयक तरतूद करण्याची आवश्यकता आहे.

**४ ड – संकल्पित योजनेची वैशिष्ट्ये**

१) संकल्पित योजना भारतीय घटनेसंदर्भातील मूलभूत बदलांशिवाय अंमलात येऊ शकते.

२) संकल्पित योजना देशाच्या समाजवादी तत्त्वप्रणालीस अनुसरूनच असेल.

३) अशा प्रकारची योजना जागतिक पातळीवर प्रथमच अस्तित्वात येईल.

४) या योजनेअंतर्गत सध्याची करदात्याकडून करवसुली पद्धतीऐवजी योग्य कराची वजावट होऊनच करदात्यापर्यंत पैसा पोहचेल. ह्यामुळे भविष्यात काळा पैसा निर्माण होण्याची शक्यता मुळातच नष्ट होईल.

५) शासनाची महसूल संकलनाची पद्धत अतिशय लवचिक बनून कुठल्याही आपत्कालीन परिस्थितीत महसूलात अतिशय कमी वेळात वाढ करणे शक्य आहे. जसे योग्य पूर्वसूचनेनुसार T.T. चे प्रमाण वाढवून ( *२% ऐवजी गरजेप्रमाणे* )

६) व्यवहारकर ही पद्धत व्यवस्थापनाभिमुख असण्याऐवजी विकासाभिमुख असेल.

**४ इ – व्यवहार कर योजनेची व्यवहार्यता / उत्पादकता**

सध्याच्या करपद्धतीच्या तुलनेत ‘ व्यवहार कर ’ योजना कशी उपयुक्त व फायद्याची ठरणार आहे, हे पुढील तक्त्यांवरून लक्षात येईल.

### केंद्र सरकारला मिळणारा महसूल

| सध्याच्या कर-प्रणालीतून मिळालेला महसूल | व्यवहार कराद्वारे मिळणारे अपेक्षित उत्पन्न ( ०.७० % केंद्र सरकारचा वाटा ) | | | |
|---|---|---|---|---|
| | ३०% व्यवहार झाल्यास | ४०% व्यवहार झाल्यास | ५०% व्यवहार झाल्यास | ६०% व्यवहार झाल्यास |
| २,३१,७४५ | ३,४५,३५२ + कस्टम ड्यूटी | ४,६०,४६९ + कस्टम ड्यूटी | ५,७५,५८७ + कस्टम ड्यूटी | ६,९०,७०४ + कस्टम ड्यूटी |
| ( कर महसूल ) १,६३,०३१ + ६८,७१४ ( कराव्यतिरिक्त उत्पन्न ) | एकूण ४,५०,५५७ ** कोटी रुपयांचा ३० ते ६० % भाग रोज बँकांद्वारे व्यवहारात येईल असे धरून ** ४,५०,५५७ = २,६५,३२५ ( चलन ) + १,८५,२३२ ( बँक मनी ) | | | |
| | सर्व आकडे कोटी रुपयात | | | |

* ( स्रोत – भारतीय रिझर्व्ह बँकेद्वारा प्रकाशित हँडबुक ऑफ स्टॅटिस्टिक्स, वर्ष २००१ )

### सर्व राज्यांचा एकूण महसूल

| सध्याच्या कर-प्रणालीतून मिळालेला महसूल | व्यवहार कराद्वारे मिळणारे अपेक्षित उत्पन्न ( ०.६० % राज्य सरकारचा वाटा ) | | | |
|---|---|---|---|---|
| | ३०% व्यवहार झाल्यास | ४०% व्यवहार झाल्यास | ५०% व्यवहार झाल्यास | ६०% व्यवहार झाल्यास |
| २,८४,६८१ | २,९६,०१६ | ३,९४,६८८ | ४,९३,३६० | ५,९२,०३२ |
| ( कर महसूल ) २,०३,०६० + ८१,६२१ ( करा-व्यतिरिक्त उत्पन्न ) | एकूण ४,५०,५५७ ** कोटी रुपयांचा ३० ते ६० % भाग रोज बँकांद्वारे व्यवहारात येईल असे धरून ** ४,५०,५५७ = २,६५,३२५ ( चलन ) + १,८५,२३२ ( बँक मनी ) | | | |
| | सर्व आकडे कोटी रुपयांत | | | |

* ( स्रोत – भारतीय रिझर्व्ह बँकेद्वारा प्रकाशित हँडबुक ऑफ स्टॅटिस्टिक्स, वर्ष २००१ )



### मुंबई महानगरपालिकेचा महसूल

| सध्याच्या करप्रणालीतून मिळालेला महसूल ( संदर्भ : महानगरपालिका अर्थसंकल्प २०००-२००१ ) | नियोजित व्यवहार करपद्धतीतून मिळणारा महसूल ( स्थानिक स्वराज्य संस्थांसाठीचा ०.३५ टक्के वाटा ) |
|---|---|
| २,७८० | २८,७०० मुंबई महानगरापालिका हद्दीत वार्षिक ८२,००,००० कोटी रुपयांची उलाढाल गृहित धरून.* |
| | सर्व आकडे कोटी रुपयात |

* ( स्रोत – *www.rbi.org.in/cheque clearance* )

## ४ फ – संकल्पित योजनेचे अपेक्षित परिणाम

१) या योजनेच्या घोषणेबरोबरच देशात अस्तित्वात असणारा काळा पैसा कायदेशीर अर्थव्यवस्थेत येऊन समांतर अर्थव्यवस्थेस धक्का बसेल. ( *उच्च दर्शनीमूल्यांच्या नोटा बंद होणार असल्यामुळे* )

२) या योजनेनुसार शासकीय महसुलात विनासायास प्रचंड वाढ होऊन अंदाजपत्रकीय तूट पूर्णतः नियंत्रणाखाली येईल व योग्य व्यवस्थापनाद्वारे परकीय कर्जातून देशाची मुक्तता होईल.

३) सध्याच्या जाचक करप्रणालीमधून सुटका मिळाल्यामुळे उद्योग व व्यवसाय क्षेत्रात नवा उत्साह संचारेल. परिणामी रोजगाराच्या अनेक संधी उपलब्ध होतील.

४) उद्योग व व्यवसाय क्षेत्रातील सध्याचा अनुत्पादक खर्च व वेळ वाचवून तो संशोधन व विकास कार्यक्रमाच्या खाती लागेल. परिणामी स्वदेशी मालाचा, सेवेचा दर्जा व पत उंचावेल.

५) सरकारचा महसूल Transaction द्वारे संकलित होणार असल्यामुळे औद्योगिक मंदी व तत्सम घटकांचा शासकीय महसुलावर परिणाम होणार नाही. परिणामी शासकीय कार्यप्रणाली अनिश्चिततेच्या वातावरणातून बाहेर पडेल.

६) ह्या योजनेनुसार सर्व शासकीय महसूल हा Transaction मधून संकलित होणार असल्यामुळे समाज विघातक उद्योगांना सरकार कार्यक्षमतेने रोखू शकेल. ( *उदा. महसूल तुटीपायी आंध्र व हरियाना शासनास दारूबंदी उठवावी लागली.* )

७) काळ्या पैशाअभावी राजकारणासह सर्व समाजाच्या शुद्धतेची प्रक्रिया चालू होईल.

८) सरकार मुबलक पैशाच्या उपलब्धतेमुळे प्रलंबित मूलभूत सोयी व सुविधांच्या योजना हाती घेऊ शकेल. ( *उदा. रस्ते, वीज, घरबांधणी इत्यादी* )

९) काळ्या पैशाच्या अनुपलब्धतेमुळे कायदा व सुव्यवस्थेवर अनुकूल परिणाम होऊन न्यायव्यवस्था अधिक पारदर्शक व लोकाभिमुख होईल. न्यायव्यवस्थेवरील दबाव कमी होऊन न्यायकार्यात वेग येईल.

१०) शासन देशहिताच्या महाप्रचंड योजना थोड्याशा सुनियोजित व्यवस्थापनाच्या सहाय्याने हाती घेऊ शकेल. ( *उदा. गंगा-कावेरी जोडणी योजना – ह्यामुळे पूर्वोत्तर भारताचा महापुराचा व दक्षिण भारताचा दुष्काळाचा प्रश्न कायमचा सुटण्यास मदत होईल. अशा योजनांसाठी शासन थोड्याशा अतिरिक्त कराचा विचार करू शकेल – जसे २% T.T. ऐवजी २.५ % T.T. ही ०.५ % T.T. तफावत फक्त अशा महाप्रचंड योजनेसाठीच लागू करता येईल, अशा महाप्रचंड योजनांमुळे रोजगाराच्या अनेक संधी उपलब्ध होतील.* )

११) समांतर अर्थव्यवस्थेच्या अस्तामुळे देशात सुरक्षिततेचे व प्रामाणिकपणाचे वातावरण तयार होईल. यामुळे भ्रष्टाचारास मोठ्या प्रमाणात आळा बसेल. परिणामी देशातील विकसित मनुष्यबळ देशातच स्थिरावून देशाच्या विकासात मोलाची भर टाकेल.

१२) देशात समान कररचना अस्तित्वात येणार असल्यामुळे देशांतर्गत वस्तूंची भावपातळी समान पातळीवर स्थिरावेल. परिणामी देशाच्या सर्वांगीण विकासास मदत होईल.



१३) T.T. च्या पद्धतीमुळे देशांतर्गत उत्पादकांना प्रोत्साहन मिळून देशाची उत्पादनक्षमता वाढेल ( *सध्या Trading हे क्षेत्र Manufacturing पेक्षा कमी त्रासाचे असल्यामुळे देशाची प्रतिभा व बुद्धी Manufacturing ऐवजी Trading कडे वळत आहे. परिणामी देशाच्या आयात-निर्यात पातळीवर विपरित परिणाम झाला आहे* ).

१४) शासनाचा महसूल रोजच्या रोज संकलित होणार असल्यामुळे विकास योजना अत्यंत कार्यक्षमेतेने योग्य वेळात व योग्य प्रकारे पूर्ण होऊ शकतील.

१५) देशातील मागास भागाचा विकास देशातील प्रगत भागावर परिणाम न करता साधता येईल ( *जसे केंद्र सरकारच्या २% महसुलातून मागास भागात अनेक विकास योजना सुरू करता येतील* ).

१६) भ्रष्टाचाररहित व अतिशय सोप्या करप्रणालीमुळे देशांतर्गत वातावरण परकीय गुंतवणुकीस अतिशय पोषक बनेल व देशहितकारक परकीय उद्योग देशात येऊन येथील प्रगतीस हातभार लावतील ( *देशहितास बाधक उद्योग शासन स्वतःच्या अधिकारात रोखू शकेल* ).

१७) भ्रष्टाचारमुक्त वातावरणाचा सर्वव्यापी परिणाम होऊन देशातील लोकमानस असुरक्षिततेच्या भावनेतून मुक्त होईल.

१८) शासकीय महसुलात होणाऱ्या संभाव्य वाढीमुळे प्रशासन अधिक सक्षम होऊन संरक्षण व परराष्ट्र धोरणामध्ये आंतरराष्ट्रीय पातळीवर अधिक आत्मविश्वासाने वावरू शकेल.

१९) संकल्पित योजनेअंतर्गत शासनाचा स्थानिक ( *नपा व मनपा* ) राज्यस्तरीय व केंद्रस्तरीय महसूल स्वतंत्ररित्या प्रत्येक पातळीवर संकलित होणार असल्यामुळे निम्नस्तरावरील शासकीय प्रशासनास सापेक्ष उच्चस्तरीय शासकीय प्रशासनाच्या महसूली अनुदान अथवा मदतीवर अवलंबून रहावे लागणार नाही. ( *जसे महाराष्ट्र राज्यातील नगरपालिकांचा जकातीद्वारे संकलित होणारा महसूल नव्या धोरणानुसार राज्य सरकारद्वारे दिल्या जाणाऱ्या अनुदानावर अवलंबून असणार*

*आहे* ) यामुळे ' पंचायती राज्याची संकल्पना ' राबविण्यास मदत होईल.

२०) पुरेशा भांडवल पुरवठ्याच्या उपलब्धतेमुळे सध्या उद्योगात अडकलेला तरंगता पैसा ( *Floating Money* ) स्थिर होईल. ( *जसे ३०,६०,९० days payment terms चा व्यवहार संपून Immediate Payment चा व्यवहार होईल.* ) परिणामी उद्योगातील जोखीम ( *Risk Factor* ) कमी होईल.

२१) सध्या अस्तित्वात असलेल्या ' वस्तुसापेक्ष ' करसंकलन पद्धतीमुळे उद्योगक्षेत्रात राजकीय हस्तक्षेपास प्रचंड वाव आहे. ह्यामुळे उद्योगक्षेत्रास आपल्या विकास प्रकल्पाबाबत व भविष्यकालीन योजनांबाबत निरनिराळ्या राजकीय पक्षांच्या ध्येयधोरणांवर अवलंबून रहावे लागत आहे. ह्याचा अतिशय विपरित परिणाम उद्योगक्षेत्राच्या दीर्घकालीन योजनांवर होत असतो. परिणामी उद्योगक्षेत्रावर सतत अनिश्चिततेचे सावट – T.T. संकल्पनेमध्ये करसंकलन ' व्यवहारसापेक्ष ' होणार असल्यामुळे उद्योगक्षेत्रात राजकीय हस्तक्षेपास पर्यायाने आर्थिक भ्रष्टाचारास काहीही वाव नाही. परिणामी देशांतर्गत उद्योग व सेवाक्षेत्र अधिक गतिशीलतेने आपला – पर्यायाने देशाचा – विकास घडवू शकतील.

२२) सध्या चलनात नसलेला काळा पैसा चलनात आल्यामुळे देशातील चलनाचा तुटवडा संपेल. परिणामी जुन्या व फाटक्या नोटांचा वापर टळेल.

२३) उच्च दर्शनीमूल्यांच्या नोटा नष्ट झाल्यामुळे बनावट नोटा चलनात येऊन होणाऱ्या देशविघातक कार्यास पायबंद बसेल.

* * *



## ५. संभाव्य शंका आणि उत्तरे

**१) भारतातील अशिक्षितांचे प्रमाण पाहता, हे अशिक्षित लोक बँकांद्वारे व्यवहार करू शकतील काय ?**

असे लोक ५० रुपये किंवा त्यापेक्षा कमी दर्शनी मूल्यांच्या नोटांद्वारे रोखीने व्यवहार करू शकतील. अशा रोख व्यवहाराचे प्रमाण ( *किंमतीच्या दृष्टीने* ) कमी आहे, तसेच अशा रोख व्यवहारासाठी करही लागणार नाही. हे भारताच्या समाजवादी धोरणाशी सुसंगत असेच आहे.

**२) सध्याच्या करप्रणालीत जे मनुष्यबळ कार्यरत आहे, त्याचे ' व्यवहार कर ' लागू झाल्यानंतर भवितव्य काय ?**

अशा लोकांना सेवानिवृत्तीपर्यंत पूर्ण वेतन आणि सेवानिवृत्त झाल्यावर निवृत्तीवेतनासह ( *गोल्डन हँडशेक* ) सर्व फायदे देऊन हा प्रश्न सोडविता येईल. सध्याच्या व्यवस्थेमधील फक्त मनुष्यबळाव्यतिरिक्त सर्व प्रशासकीय खर्चात बचत होणार असल्यामुळे हा प्रस्ताव नक्कीच व्यवहार्य ठरतो.

**३) ' व्यवहार कर ' योजनेमुळे भारतीय अर्थव्यवस्था चलनरहित होणे अपेक्षित आहे काय ?**

' व्यवहार कर ' ह्या संकल्पनेमुळे भारतीय अर्थव्यवस्था चलनरहित होणे अपेक्षित नाही. फक्त चलनाचे सर्वोच्च दर्शनी मूल्य ५० रुपये किंवा त्यापेक्षा कमी राहील एवढेच. अशा रोख व्यवहारांवर कर आकारला जाणार नाही. छोट्या मूल्यांच्या नोटा गरीब – तळागाळातील लोकच जास्त वापरतील. कारण त्यांचे व्यवहार छोट्या स्वरूपाचे असतात. अशा छोट्या स्वरूपाच्या रोख रकमेवर कर नसल्याने गरीब लोकांवर कराचा बोजा मुळीच पडणार नाही. तथापि, आर्थिकदृष्ट्या सबळ लोकांना ( *ज्यांचे आर्थिक व्यवहारही मोठेच असतात,* ) बँकांच्या माध्यमातून व्यवहार करावा लागेल. कारण छोट्या नोटांच्या साहाय्याने मोठ्या मूल्यांचे व्यवहार करणे गैरसोयीचे ठरेल. तसेच प्रत्येक व्यवहार

बँकेच्या माध्यमातून झाल्याने त्याची नोंद राहील. त्यामुळे भ्रष्टाचारावर आपोआपच अंकुश बसेल.

**४) व्यवहार करामुळे अनेक कर वाढून परिणामी वस्तूंचे / सेवांचे दर वाढतील काय ?**

प्रस्तावित योजनेनुसार कर-जाळ्याचा ( *Tax Net चा* ) प्रचंड प्रमाणात विस्तार होणार असल्यामुळे वस्तू व सेवा यांचे मूल्य निश्चितच कमी होईल. त्याचबरोबर बँकांना मिळणाऱ्या अतिरिक्त महसुलामुळे भांडवल जास्त किफायतशीर होईल. परिणामी स्पर्धात्मक किमतीत भारतीय उद्योग जागतिक बाजारपेठेत जम बसवू शकतील.

आजच्या खुल्या बाजारपेठेच्या युगात वस्तू / सेवा यांच्या किमतीची रचना नैसर्गिक स्पर्धेनुसार ठरेल. व्यवस्थापनातील प्रभावी तंत्रांनी वस्तू / सेवा यांच्या किमती जागतिक बाजारपेठेत नियंत्रित केल्या जातील.

**५) आदर्श करप्रणालीच्या तत्त्वांचे पालन ‘ व्यवहार कर ’ योजनेत होते काय ?**

व्यवहार करप्रणाली पुढील आदर्श तत्त्वांचे पालन करते :

**(अ) समतेचे तत्त्व ( *Canon of Equity* ) :**

प्रत्येक व्यक्तीची जेवढी ताकद असेल तेवढाच कर त्याने सरकारला द्यावयाचा आहे. त्यामुळे ‘ व्यवहार कर ’ संकल्पना ही शास्त्रीय करप्रणालीत समतेच्या तत्त्वाचे पालन करते.

**(ब) निश्चिततेचे तत्त्व :**

याचा अर्थ दिला जाणारा कर हा निश्चित असेल आणि वाटेल तसा नसेल. किती कर भरायचा, कधी आणि कशा स्वरूपात हे करदात्याला माहीत असेल. याचा अर्थ ‘ व्यवहार कर ’ हा निश्चिततेच्या तत्त्वाचे पालन करतो. जर कर ‘ निश्चित ’ असेल, तर करखात्याचे अधिकारी करदात्याची



छळवणूक करू शकणार नाहीत. यात करदाता आणि सरकार यांचा फायदाच होईल. कारण किती कर भरायचा हे करदात्याला वेळीच कळणार असल्याने तो तरतूद करून ठेवेल आणि कराच्या रूपाने किती महसूल येणार याची निश्चित माहिती सरकारला असल्याने खर्चाचे नियोजन करता येईल. ‘ व्यवहार कर ’ हा निश्चिततेच्या तत्त्वाचे १०० टक्के पालन करतो हे उघडच आहे.

**(क) सोयीस्करपणाचे तत्त्व :**

शास्त्रीय करप्रणाली असे म्हणते की, करदात्याला झेपेल अशा पद्धतीने आणि गैरसोय होणार नाही, अशा पद्धतीने कर घेतला जावा. याचा अर्थ कर आकारणी पद्धत करदात्याच्या सोयीची हवी.

‘ व्यवहार कर ’ पद्धतीत करदात्याला कर भरण्याची गरज नसते. करदात्याच्या खात्यातून बँक आपोआप कर कापून घेते. तसेच केंद्र सरकार, राज्य सरकार आणि स्थानिक स्वराज्य संस्था यांच्या खात्यातही त्यांच्या महसुलाचा वाटा आपोआप जमा होतो. याचा अर्थ वरील तत्त्वाचे ‘ व्यवहार कर ’ तंतोतंत पालन करतो.

**(ड) किफायतशीरपणाचे तत्त्व :**

जमा होणाऱ्या महसूलापैकी मोठा वाटा सरकारच्या तिजोरीत जमा व्हावा अशी अपेक्षा असते. याचाच अर्थ करवसुलीसाठी कमीत कमी खर्च झाला पाहिजे. प्रस्तावित ‘ व्यवहार कर ’पद्धतीत कर गोळा करण्यासाठी सरकारला पैसे खर्च करण्याची गरज राहणार नाही. याचा अर्थ किफायतशीरपणाच्या तत्त्वाचे पालन करणारी ही पद्धत आहे.

**(ई) उत्पादकतेचे तत्त्व :**

सरकारला पुरेसे उत्पन्न मिळावे अशा पद्धतीने कररचना असली पाहिजे. ‘ व्यवहार कर ’ पद्धत अगदी याच पद्धतीची आहे. या पद्धतीची व्यवहार्यता आणि उत्पादकता तुलनात्मक आकडेवारीच्या तक्त्यावरून ( *पृष्ठ क्रमांक २२ व २३* )

कुणाच्याही चटकन लक्षात येते.

**(फ) सोपेपणाचे तत्त्व :**

शास्त्रीय करपद्धतीप्रमाणे प्रत्येक कर सोपा, सुटसुटीत हवा. करातील बारकावे — माहिती तज्ज्ञांच्या मदतीशिवाय करदात्याच्या लक्षात आली पाहिजे. करपद्धती जर जटिल आणि गंतागुंतीची असेल तर करदात्याला कर भरण्यासाठी तज्ज्ञांची मदत घ्यावी लागते. त्याशिवाय देशातील भ्रष्टाचारही गुंतागुंतीच्या करपद्धतीमुळे वाढतो ते वेगळेच. त्यामुळे सध्याच्या करपद्धतीसापेक्ष ' व्यवहार कर ' ही पद्धत निर्विवाद सोपी सुटसुटीत आहे, यात कसलीही शंका नाही.

**(ग) योग्यतेचे तत्त्व :**

कर आकारणी अशा मूलभूत तत्त्वावर उभारली गेलेली असावी की ज्यामुळे सरकारला कसलाही युक्तिवाद वा समर्थन करण्याची गरज भासू नये. दुसऱ्या शब्दात सांगायचे तर सरकारच्या इच्छा काय आहेत याबद्दल शंकेला जागा राहता कामा नये. ' व्यवहार कर ' ही अगदी अशीच पारदर्शक आणि सोयीस्कर पद्धत आहे. आदर्श करप्रणालीच्या तत्त्वांचे यात पूर्णपणे पालन होते.

**६) हातउसने आणि छोट्या रकमेचे व्यवहार यावर ' व्यवहार कर ' योजनेचा विपरित परिणाम होणार नाही काय ?**

' व्यवहार कर ' योजनेतही रोख व्यवहार होतीलच. रोखीच्या व्यवहारावर कुठलाही कर लागू होणार नसल्याने उपरोक्त व्यवहारांवर कुठलाही परिणाम होणार नाही.

**७) भांडवल बाजार यावर व्यवहार करयोजनेचा विपरित परिणाम होईल काय ?**

जेव्हा ' व्यवहार कर ' योजना लागू होईल तेव्हा व्यवहार करताना भांडवल बाजारात निश्चित स्वरूपातील व्यवहार करदराचा विचार करूनच आर्थिक व्यवहार करावे लागतील.



**८) आर्थिकदृष्ट्या विकसित राष्ट्रांमध्ये व्यवहार करपद्धत का लागू करण्यात आलेली नाही ?**

सध्याच्या करपद्धतीपेक्षा ' व्यवहार कर ' पद्धतीचे अनेक फायदे आहेत याचा विचार करून आर्थिकदृष्ट्या प्रगत राष्ट्रांमध्ये व्यवहार करपद्धतीचा अंगिकार केला जाऊ शकतो. कर चुकविण्याचा प्रयत्न केल्याबद्दल प्रख्यात टेनिस खेळाडू स्टेफी ग्राफ हिच्या वडिलांना जर्मनीत दंड भरावा लागला होता, हे सर्वश्रुतच आहे. यावरून हे लक्षात येते की, कर बुडविणे ही मनोवृत्ती जगभरात आहे. फक्त ' व्यवहार कर ' पद्धतीनेच करचुकवेगिरीला आळा बसू शकतो.

**९) कर चुकविणे हा लोकांचा सर्वसाधारण स्थायीभाव असल्याने ' व्यवहार कर ' पद्धती लागू झाल्यावर लोक वस्तू-विनिमयाकडे ( *Barter* ) वळतील काय ?**

एकविसाव्या शतकात barter पद्धतीने व्यवहार केला जाण्याची सुतराम शक्यता नाही. कारण आपण दिलेल्या वस्तूवर हवी तीच वस्तू मिळणे शक्य नाही. वस्तू आणि सेवा यातील वैविध्यतेचा विचार करता ते शक्यही नाही. तसेच ' व्यवहार कराचा अत्यल्प दर ' व ' व्यवहार करामुळे होणारे बँक-पतसंवर्धन ' या वैशिष्ट्यांमुळे लोकमानस ' व्यवहार कर ' संकल्पनेचा आनंदाने स्वीकार करेल.

**१०) कर्ज खात्यात कर्ज जमा करण्याच्या व्यवहारात बँकेच्या व्याजावर ' व्यवहार कर ' योजनेचा विपरित परिणाम होणार नाही काय?**

व्यवहार कराचा विचार करूनच बँकांना कर्जाचे व्याजदर ठरवावे लागतील.

**११) सध्याच्या भ्रष्ट व्यवस्थेवर आधारित असलेल्या राजकीय आणि नोकरशहांच्या विरोधावर कशी काय मात करता येईल ?**

सध्याच्या मुक्त बाजारपेठेच्या युगात राजकीय शक्तीपेक्षा

आर्थिक शक्ती वरचढ आहेत. दृढनिश्चयाच्या व प्रखर राष्ट्रीय भावनेच्या जोरावर या समस्येतून मार्ग काढता येईल. लोकांच्या अपेक्षा आणि हित यांचा आदर करण्यासाठी सरकारला हा निर्णय घेणे भाग पडेलच.

**१२) ' व्यवहार कर ' योजना लागू करण्यासाठी काय कृती योजना असावी ?**

प्रचलित करप्रणालीतील क्लिष्टता ' व्यवहार कर ' पद्धतीद्वारा पूर्णतः संपुष्टात येणार असल्याने ' व्यवहार कर ' पद्धतीच्या अंमलबजावणीसाठी राष्ट्रीय जनमत तयार करणे सहज शक्य आहे. यामुळे ' व्यवहार कर ' पद्धतीची अंमलबजावणी तात्काळ शक्य आहे.

फक्त बँकांची त्यासाठी तांत्रिक सुसज्जता अपेक्षित आहे. कारण ' व्यवहार कर ' गोळा करण्यासाठी बँक हेच एकमेव माध्यम असणार आहे.